International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.4 Mar-Apr- 2022

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय योगदान

**प्रा. दिनेश न. गूजर**
*शरदचंद्र कला व वाणिज्य महाविद्यालय, बुटीबोरी. ता. जि. नागपूर*

**शिक्षणाविषयी प्रेरणा :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९१३ साली अमेरिकेत शिक्षणासाठी गेले. तेव्हा तेथून वडीलाच्या एका मित्रास पत्राद्वारे कळवितात — ''आपल्या अस्पृश्य समाजातील प्रत्येक कार्यकर्त्याने शिक्षणप्रसारासाठी झटले पाहीजे.'' शिक्षणाचा प्रसार त्यांना पददलीतांच्या दैन्यावर रामबाण उपाय वाटतो. पूढे ते स्पष्ट करतात की, आईबाप मुलाच्या आयुष्याला वळण लावू शकतात, ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबर मुलींच्याही शिक्षणासाठी धडपड केली, तर आपल्या समाजाची प्रगती झपाटयाने होईल. यात स्वाभिमान, स्वावलंबन, आत्मोद्धार चळवळीची बीजे दिसून येतात. सर फिरोजशहा मेहताच्या स्मृतीप्रित्यर्थ मुंबई भक्कम वाचनालय उभारण्याचा निर्देश देतात. २० जुलै १९२४ रोजी स्थापन बहिष्कृत हितकारीणी सभेला 'शिका, चेतवा, संघटीत व्हा' असा संदेश (ब्रीद) दिले. वस्तीगृहे, शैक्षणिक वर्ग, स्वाध्याय संघ, औद्योगिक व शेतकी शाळा उभारण्याचे ध्येय ठरविले. मुंबई येथे पिपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन करून शैक्षणिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालय उघडले. तथागत भगवान गौतम बुध्दांचा बुध्दीप्रामाण्यवाद त्यांच्या शैक्षणिक क्रांतीचे मुलस्त्रोत होय. नागसेनाची बौध्दीक प्रगल्भता आणि मिलींदाची सत्यान्वेषी सचोटी यावर त्यांचा ठाम विश्वास होता. कोलंबिया विद्यापीठाच्या ३०० वर्षाच्या वाटचालीत ज्ञानाचे प्रतिक (symbol of knowledge) झालेला असा विद्यार्थी एकमेवाद्वितीय. दररोज सातत्याने १८—१८ तास अभ्यास करणे. १९२३ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतात सर्वोच्च विद्याविभूषीत झालेले होते.

**नीतीमान क्रांतीचा दिपस्तंभ :—**

गौतम बुध्द, संत कबीर आणि महात्मा फुले यांच्या विचारांचे ते निष्ठावान पाईक होते. मानवतेच्या शत्रूविरूध्द त्यांचा रणसंग्राम होता. भारतात ऐक्य आणि सौख्यासाठी सामाजिक विकृती हद्दपार करण्याशिवाय तरणोपाय नाही. विषमतेवर आधारीत जन्मानूगत जातीयता परस्परांविषयी कटूता आणते. जातींची तटबंदी एकमेकांना परस्परांपासून दुरावत नेते. कुत्सित द्वेषभाव आणते म्हणून जातीविरहीत ;ब्ंजसमेद्ध समाज स्थापन करणे आवश्यक आहे. नूसते जनतंत्र (लोकशाही) आणि गणतंत्र ;त्मचनइसपबद्ध चा ढिंढोरा पिटून अर्थ नाही. भारत कल्याणकारी राज्य झाले पाहीजे. सर्वांना हा देश आपला वाटला पाहीजे. शोषण, दडपण राहू नये. "Democracy is the System of Government of revolutionary changes in Social, Economic and Political Life having no any bloodshadeष् अर्थात त्यांच्या या लोकशाहीच्या व्याख्येत बुध्दाची करूणा आहे. १९०७ साली मॅट्रीकची परीक्षा पास झाले. तेव्हा केळुस्कर गुरूजींनी 'बुध्दचरीत' पुस्तक भेट दिले. ९ ते १९१६ रोजी त्यांनी गोल्डनवाइझरच्या सेमिनारमध्ये 'भारतातील जाती, तिची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास' हा निबंध वाचला होता. तेव्हा तेथे अनेक नामवंत विद्वान बसलेले होते. बाबासाहेबांनी पूर्वसूरींचे संशोधन निखालस चुकीचे ठरवून स्वत:मधील संशोधक क्रांतीकारी समाजशास्त्रज्ञांचा परीचय करून दिला. जात—पात तोडक मंडळाच्या लाहोर (१९३६) च्या भाषणासाठी ११६ दिवस खर्ची करून तयारी केली. तयार भाषण 'जाती निर्मुलन' (Annihilation of Caste) या नावाने प्रकाशित केले. धर्मांतराच्या घोषणेने अनेकांची दाणादाण उडाली.

परंतु विध्वसंक राष्ट्रीयता त्यांनी कधीच अवलंबिली नाही. इतिहास, संस्कृती, नीतीधर्म यावर त्यांची निस्सीम श्रध्दा होती. जातीय विषमतेची पाळेमुळे निखंदल्याशिवाय भारताचे राष्ट्रीय सौष्ठव उभारता येणार नाही, अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती.

**स्त्रियांचे उत्थान :–**

आज आपण तीन तलाकच्या विरोधात जद्दोजेहाद पुकारला. बाबासाहेबांनी १९५२ साली स्त्रीयांच्या उत्थानासाठी 'हिंदु कोड बिल' मांडले. बिल पारीत करण्यास सरकारने कुचराई केली. म्हणून बाबासाहेबांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. स्त्रीयांच्या प्रसूती रजांचे महत्व शासनाला समजावून सांगितले. त्यामूळे ब्रिटीशांनी प्रसूती रजा मंजूर केल्या. त्याचा बोध घेवून जगात अनेक देशांमध्ये स्त्रीयांना प्रसूती रजा मिळाली. अनेक देशांमध्ये १९७० पर्यंत स्त्रीयांना मतदानांचा अधिकार नव्हता. त्यासाठी आंदोलने करावी लागतात. बाबासाहेबांनी एकाच दणक्यात स्त्रियांना पुरूशांच्या बरोबरीचा मतदानाचा अधिकार दिला. सोडचिठ्ठी, वडीलोपार्जित संपत्तीवर हक्क, दत्तक विधान इ. बाबत भारतीय स्त्री पूरूषांच्या बरोबरीने अधिकार उपभोगत आहे. अनादी काळाच्या इतिहासात संपूर्ण भारतवर्षाचा शासक म्हणून एखाद्या स्त्रीचा, दलीतांचा, शुद्रांचा राज्याभिषेक सहजासहजी अगर सर्वसंमतीने झाल्याचे ऐकीवात नाही. मात्र बाबासाहेबांच्या कृपेने इंदिरा गांधी, के. आर. नारायणन, प्रतिभाताई पाटील, रामनाथ कोविंद हे सर्व स्त्रीशुद्रातिशुद्र समूहातील लोक सन्मानपूर्वक शपथविधीने सत्तारूढ झाले. ''एक व्यक्ती–एक मत–एक मुल्य'' हे लोकशाहीचे अधिष्ठान त्यांना अहर्निश वाटायचे. २५ डिसेंबर १९२७ च्या आंदोलनात, २ मार्च १९३० पासून पूढे ५ वर्षे ७ महीने ११ दिवस चाललेले नाशिक येथील काळाराम मंदीर आंदोलन इ. जवळपास सर्वच आंदोलनांमध्ये स्त्रीयांना सहभाग दिला. स्त्रीयांचा आत्मविश्वास उंचावला. संवैधानिक तरतूदीमूळे स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात पूरूषांच्या बरोबरीने प्रगतीसाठी झेपावत आहेत.

**उत्स्फूर्त राष्ट्रभक्तीचा दिपस्तंभ :–**

नंपूसक वंशाला राष्ट्रभक्तीसाठी इतरांकडून प्रेरणा घ्यावी लागते. मुलत: राष्ट्रभक्ती हा उधारउसनवारीचा भाग होवू नये. लष्करी घराण्यातील जन्मदत्त वारशामूळे ते स्वयंसिध्द राष्ट्रभक्त होते. कचखावू बोटचेपेपणा त्यांना नापसंत होता. स्वत:च्या खाजगी ग्रंथलयात युध्दशास्त्रावर ३०० ग्रंथ बाळगणारा, महायोद्धा नेपोलियनचे आत्मचरित्र नित्यनेमाने वाचणारा व्यक्ति राष्ट्रभक्तीसाठी किती शौर्याचा वसा अंगिकारत असेल? हे सांगण्याची गरज नाही. भिमा–कोरेगावच्या शौर्यस्थळास ते दरवर्षी अभिवादन करायचे. स्वत:च्या सोयीची राजकीय सत्ता चालविण्यासाठी राष्ट्रीय स्वातंत्र्याची अभिलाषा बाळगणारांना ते शोषीत–पिडीतांच्या स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्याचे स्थान यावर सर्वांना आवाहन करीत होते. विद्यार्थी असतांना त्यांनी केलेले संशोधन पूर्ण देशभक्तीपूर्ण आणि ब्रिटीश शासनाची खरडपट्टी काढणारे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रॉयल कमिशनला साक्ष देतांना म्हणतात–''हुंडावळणीच्या अदलाबदलीत सुवर्ण परिमाण सुरू ठेवणे भारताच्या हिताचे नाही. कारण सुवर्ण परिमाणाला भारतात मुळचे स्थैर्य नाही. ब्रिटीश कायद्यांद्वारे भारतीयांचे अपरिमित शोषण सुरू आहे. निव्वळ ब्रिटीशांच्या आर्थिक लाभासाठी येथील अर्थव्यवस्था वेठीस धरलेली आहे, असे ते नमूद करतात. लाला लाजपतरायांचा लाठीहल्ल्यामूळे मृत्यू झाला. तेव्हा त्यांना श्रध्दांजली देण्यासाठी मुंबईत सभा घेतली. त्यांची राष्ट्रभक्ती सर्व राष्ट्रबांधवाच्या उन्नतीसाठी वाशिंग्टन प्रमाणे लोकशाहीप्रवण होती. १७ ते २१ नोव्हेंबर १९३० दरम्यान पर्षहिली गोलमेज परिषद झाली. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राष्ट्रभक्तीवर भुमिका अनन्यसाधारण होती. 'असले सरकार काय कामाचे?' असा रोखठोक सवाल त्यांनी थेट ब्रिटीश राजांसमोर भर परीषदेत एकदम इंग्लंडमध्ये केल्याने ब्रिटीश प्रतिनिधी एकमेकांकडे डोळे विस्फारून पाहू लागले. तेथे मोठया आवेशाने बाबासाहेब म्हणाले–'जे देशाचे खरे हित निष्ठापूर्वक साधेल आणि न्याय आणि निकडीचे असे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न कुणाच्याही रागालोभाची पर्वा न करता सोडवील.'

भारतात ब्रिटीशविरोधी भुमिका घेणारे इंग्लंडमध्ये ब्रिटीशांच्या ताटाखालचे मांजर बनतात. ते त्यांना मान्य नव्हते. सायमन कमिशन विरोधामूळे कॉंग्रेसने गोलमेज परिषदेत भाग घेतला नाही. मात्र म. गांधीजींनी अहवाल वाचला. त्यावरून ते बाबासाहेबांना 'तुम्ही थोर राष्ट्रभक्त आहात' असे म्हणतात.

**अनन्यसाधारण राष्ट्रीय योगदान :—**

सर्वसामान्यपणे पुढारी बहुमताच्या मर्जीने किमानपक्षी त्यांच्याच हितासाठी राजकारण दामटतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अल्पसंख्य सर्वहारा समाजाचे हितसंबंधासाठी बहुसंख्यांकाविरोधात लढाई करण्याची पाळी आली. प्रचंड विकृत धर्मसंहीता टप्प्या—टप्प्याने मानसोपचाराने शांतपणे सहन करत परीवर्तन करायचे असा तथाकथित नेत्यांचा समज होता. धर्माला भावनांचा मुद्दा बनवून शक्तीशाली प्रस्थापित धर्ममार्तंड दुर्बल शोषीत—पिडीतांना सातत्याने सोयीचे गुलाम बनवू पाहत होते. ती धार्मिक गुलामी युगानूयूगे अव्याहतपणे प्रचलित होती. तूटलेल्या सर्वथैव उध्वस्त लोकांना सन्मानाचे जीवन देणे सोपे नव्हते. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्रतस्थ होते. त्यासाठी त्यांनी बलदंड अनूयायांचे सर्वेसर्वा मं. गांधीजींशी संघर्ष पुकारला. ब्रिटीश शासनाला धारेवर धरले. अर्थात केरळ अस्पृश्य जातीगटांपूरते कार्योद्घाटन केले असले तरी त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व राष्ट्र बांधणीच्या दृष्टीकोनातून अत्यंत मौलीक ठरत आहे. लेखन स्वरूपातील त्यांचे चिंतनमंथन चिरंतन परामर्शदायी आहे. १९३६ साली लिहीलेला 'जातीव्यवस्थेचे निर्मूलन' हा प्रबंध महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने पूनश्च छापला. प्रबोधनासाठी इतके प्रदीर्घकालीन वैचारीक रसायन अन्य कोणीही दिलेले नाही. त्यांनी सामाजिक परीवर्तन आणि राष्ट्राची एकात्मिक उन्नती यासाठी अत्यंत निर्भिडपणे विचार मांडलेत. The Evolution of Provincial Finance in British India या ग्रंथात —'गुन्हे होवू नयेत म्हणून प्रतिबंधक निर्बंधाची गून्हा आणि दंडसंहीतेत तरतूद केली आहे. त्यावर संतूष्ट न राहता कार्यकारीणीने पृथ्वीच्या पाठीवर कुठल्याही देशात झाले नसतील असे काळे निर्बंध करून हिंदी निर्बंध संहीतेस काळीमा लावला आहे. नोकरशाही ही सनातनी, दडपशाहीवृत्तीची नि बेजबाबदार असून ती सर्व महसूल, शिक्षण नि उद्योगधंदे यावर खर्च न करतात नोकरशाहीवर उधळत आहे.' असे खडे बोल ब्रिटीशांना सुनावून विद्यार्थी दशेत त्यांनी कणखर राष्ट्रीय नागरिकत्वाचा परीचय दिला. अशा तऱ्हेने विद्यार्थी दशेपासून त्यांचे 'राष्ट्र' आणि समाजाविषयी चिंतन मंथन सुरू होते. जागतिक किर्तीच्या विचारवंताचे विचारसुध्दा बाबासाहेब विश्लेषणपूर्वक खोडून काढत होते. बर्ट्रान्ड रसेल यांच्या 'सामाजिक पुर्नरचनेची तत्वे' या ग्रंथाचे टिकात्मक परीक्षण केले. बाबासाहेबांच्या मते — 'युध्दाचा नायनाट केवळ बौध्दीक पातळीवर आव्हान करून होणार नाही. तर युध्द प्रवृत्तीला विरोध करणारे मनोविकार नि जीवनाकडे पाहणाऱ्या विधायक प्रवृत्ती यांच्या संवर्धनामुळे होईल. हे रसेलचे म्हणणे यथार्थ आहे. रसेल हे युध्दविरोधी होते. परंतु शांतीपंथवादी नव्हते. क्रियाशीलतेमुळे वाढ होते. निश्चलतेने नाश होतो. शक्ती म्हणजे उत्साह आणि ती विधायक कार्य साधण्याकडे लावला पाहीजे. तिचा वापर संहाराकरीता होता कामा नये. 'बाबासाहेब युध्द, धर्म, नीती, विधी, विमा, कृषी, समाज, अर्थ, शासन, कामगार, कारखानदारी, इतिहास, संस्कृती, भुंकप, धरणे, विद्यूत, पाणी अशा सर्व क्षेत्रांवर तर्कपूर्ण तत्वसिध्द परामर्शदायी चिंतन करत होते. त्यांच्यामूळे भारताला सर्वतोपरी उत्कृष्ट संविधान लिहून मिळाले.

धम्म दिला जगण्यासाठी,
जीवनाची शान जयभिम।
स्वाभिमानाने जगण्यासाठी,
जीवनाचा प्राण जयभिम।।

**विकास कोणाचा?**



**प्रा. दिनेश न. गूजर**

जे विकास करण्यास तत्पर आहेत. अंगभूत गुणवत्ता वाढविली पाहीजे. असे ज्यांना वाटते; जे नवी आव्हाने स्विकारण्यास सिध्द ठरू शकतात. ज्यांच्यात सर्वथैव परीश्रमाची प्रामाणिक तयारी आहे. अशा लोकांना सामर्थ्यसिध्दीपासून आणि समृध्दी संपादनापासून परागंदा करणे आणि ऐतखावू दांभिक लोकांना, विकासाची नवी विवेकबुध्दी नसतांना सातत्याने सुखसोयी, संरक्षणात ठेवणे हे सामुदायिक उन्नतीचे नव्हे, तर ते अधोगतीचे लक्षण ठरते. असा समाज, देश, संस्कृती विकासाऐवजी विनाशाच्या वाममार्गाने गौरवशाली अभिधारणा लयाला नेते.

**जग जिंकण्याचे तत्वज्ञान :–**

अंधश्रध्दा, धर्मांधता, अन्याय याची चिकीत्सा नव्हे तर चर्चा बरेचजण करतात. मात्र धर्मशास्त्राची चिकीत्सा करण्यास त्यांची हिंमत धजावत नाही. म्हणून ती चर्चा वरपांगी ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धार्मिक व्यवहार आणि धर्मशास्त्र याची एकसाथ चिकीत्सा केली. धर्मांधता न जुमानता त्यांनी धर्मशास्त्राची परखड चिकीत्सा केली. धर्म माणसांसाठी की माणूस धर्मासाठी? असा सडेतोड प्रश्न विचारला. आदर्श समाज रचना कशी उभारता येईल? याचे सातत्याने चिंतन केले. त्यासाठी तार्कीक आणि तात्वीक अधिष्ठानाचा मागोवा घेतला. महाडचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, पुण्यात पर्वती मंदीर प्रवेश आंदोलन, अमरावतीला अंबादेवी मंदीरात प्रवेशासाठी आंदोलन केले. पुराणमतवादी परंपराप्रिय लोकांच्या मानसिकतेत बदल घडण्यासा पर्याप्त वाव नसल्याने धर्मांतरात सामील होणार त्यांच्यासह, नाही येणार त्यांची फार तमा न बाळगता आणि विरोधकांचा विरोध पत्करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर घडविले आणि भारताला पूनश्च जग जिंकण्याची संधी दिली.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात –**

हाती न घेता तरवार
बुध्द राज्य करी जगावर

अस्पृश्यांना गाव–गल्लीतही दखलपात्र मान–सन्मान संरक्षण नव्हते. आजमितीस आपण सर्वजण जागतिक जंक्शनवर दाखल झालेलो आहोत. त्यामूळे कोणाला लाल झेंडी दाखवायची; कोणाला हीरवी झेंडी दाखवायची हे आपण कसे ठरविणार हा आपल्यासमोर आव्हानात्मक प्रश्न आहे. रंगशास्त्रानूसार लाल आणि हिरवा एकत्र मिळविल्यास निळा रंग तयार होते. आपण भीमाचे लाल असल्याने अन्यत्र लाल रंगात स्वल्पसंतोश मानण्यात अर्थ नाही. भारताचा राष्ट्रीय बगिचा मानवतेच्या पौष्टीक फळां–फुलांसाठी कसा हिरवाकंच करता येईल? याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे.

सदियों से थे बदसूरत
अभी बन रहे खूबसूरत
नही लगना चाहीए बुरी लत
क्योंकी संभालनी है आंबेडकरी दौलत
हमारी आन–बान–शान है, इसीके बदौलत

**समृध्दीचा खजिना :–**

मनुष्यमात्र जन्माला येतांना काही अंगभूत गुणवत्ता होवून येतो. प्रत्येकाला व्यक्तिमत्व विकासाची संधी मिळणे अनिवार्य असते. तथागत भगवान गौतम बुध्द आणि सम्राट अशोकानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ती संधी आपणास म्हणजे समस्त भारतीयांना उपलब्ध करून दिलेली आहे. नीतीमान प्रगतीचा असा राजमार्ग कोठेच भेटणार नाही. म्हणूनच विकासाची आगेकुच करतांना विध्वंसकता आणि विनाशाचा प्रतिबंधात्मक विचार करून नियोजनपूर्वक त्याला आवर घातली पाहीजे. बौध्द संस्कृतीत प्राचीन काळी वर्षावासात त्याचा सातत्याने निदिध्यास ठेवण्यात येत होता.

वर्षावास म्हणजे उपवास नव्हे

तो क्रांतीचा च्यवनप्राश आहे. काहीजण रचतात कारस्थाने अंधाराची
मात्र आमच्याजवळ 'जयभिम'चा प्रकाश आहे.
लोकशाहीत रेंगाळू नका –

मतदान केले, प्रतिनीधी निवडून पाठविले म्हणजे आपला कार्यभाग संपला असे नाही. प्रस्तावनेत लोकशाहीच्या पलीकडे गणराज्य (Republic) ही संकल्पना प्रविष्ट केली आहे. इंग्लंडच्या निरंकुश राजेशाहीला मर्यादीत राजेशाही करून तेथे कायदेमंडळाची पंतप्रधानीय सत्ता स्थापन झाली. सर्वंकष हुकूमशहासुध्दा स्वत:च्या सत्तेला लोकहितैषी मानतात. अमेरिका हा अत्यंत तंत्रवैज्ञानीक प्रगती साधणारा अद्ययावत जीवन जगणारा भौतिकवादी, विज्ञानवादी आधुनिक देश आहे. परंतू तो सुध्दा प्रस्थापितांच्या पारंपारीक मानसिकतेतून पूरता सूटलेला नाही. परंपरा सहजासहजी पिच्छा सोडत नाही. अमेरिकेत प्रारंभी स्थायिक झालेल्या १३ वसाहतीमध्ये ब्रिटीशांची संख्या जास्त होती. त्यांनी प्रस्थापितांसाठी असलेले कायदेमंडळाचे वरीष्ठ सभागृह फार श्शक्तीशाली बनविलेले आहे. इंग्लंडला वरीष्ठ सभागृहास हाऊस ऑफ लॉर्डस् म्हणतात. सुरूवातीला ते फार प्रभावशाली व शक्तीशाली होते. आता हाऊस ऑफ लॉर्डस्ची सत्ता आणि अधिकार फार कमी झालेत. मात्र अमेरिकेत सिनेटचा शिष्टाचार चालतो. त्यांच्या संमतीशिवाय अमेरिकेच्या अध्यक्षाला काहीच करता येत नाही. सिनेटने आक्षेप घेतल्यास अध्यक्षाला स्वत:चा निर्णय, धोरण मागे घ्यावे लागते. आपल्या देशात ऐनकेन प्रकारेन प्रस्थापित वंशावळी आपले राज्य–साम्राज्य, सामाजिक नियंत्रण, सत्ता वर्चस्व कायम राखण्याचा प्रयत्न करतात. गणराज्य वंशतत्वाला मान्यता देत नाही. बौध्द धम्म हा गणराज्याचा दिपस्तंभ आहे. दांभिक कारस्थान्यांना तो फार अडचणीचा ठरतो.

**बौध्द धम्मामूळे सर्वांगीण समृध्दी –**

सब्बे सत्था सुखी होन्तु, सब्बे होन्तु च खेमिनो ।
सब्बे भद्राणि पस्सन्तु, माकच्चि दुक्खमागमा ।।

(सारे प्राणी सुखी होवोत, सर्वांचे कल्याण होवो, सर्वांना हिताचा मार्ग सापडो, कोणालाही दु:ख न होवो.) सब्ब सुख गाथेचा इतका मराठी अनूवाद जरी लक्षात घेतला तरी बुध्दाच्या धम्माचे विशाल करूणा विश्व लक्षात येते. मार्क्सने कामगाराच्या हुकूमशाहीत भांडवली व्यवस्था संपूष्टात आणण्यासाठी भांडवलदारांना रक्तपाताने समाप्त करण्याचा सल्ला दिला. अलेक्झांडरचा गुरू ॲरीस्टॉटलने गुलामीचे समर्थन केले. ॲरीस्टॉटलचा गुरू प्लेटोने साम्यवाद प्रतिपादन केला. स्त्रियांचा साम्यवाद आणि संपत्तीचा साम्यवाद सांगितला. कौटुंबिक वर्तूळामूळे मनुष्य पथभ्रष्ट बनतो. म्हणून कुटूंब नाकारले. ॲरीस्टॉटलचा गुरू सॉक्रेटीसने अंधश्रध्दा, धर्मथोतांड याविरूध्द आवाज उचलला म्हणून त्याला तत्कालीन राज्यकर्त्यांनी विष देवून मारले. या सर्व विचारवंताच्या पूर्वी भारतात सामाजिक, आर्थिक, धार्मिक, नैतिक चिकीत्सा करणारी एक महान व्यक्ति झाली. अर्थात ती व्यक्ती म्हणजे तथागत गौतम बुध्द होय. त्यांनी मानवतावादाचे एकमेवाद्वितीय तत्वज्ञान मांडले. सॉक्रेटीसने दांभिक श्रध्देच्या बाजाराविरूध्द आवाज उचलला. त्याचा शिष्य त्याची विचारधारा पूढे चालविण्याऐवजी 'आदर्श राजा' आणि 'आदर्श राज्य' याविषयी कल्पना मांडून बुध्दी साहस व वासनेच्या आधारावर समाजाचे तीन वर्गात विभाजन करण्याचा सल्ला देतो. कौटिल्याच्या काळात ॲरीस्टॉटल भारतात आला. त्याने संकल्पिलेला 'राजा' त्याला घडविता आला नाही. भारतात सुरूवातीला ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, हे तीनच वर्ण होते. असे अनेकांचे संशोधन आहे. शुद्र आणि नंतर अतिशुद्र–अस्पृश्य (पंचम वर्ण) तयार झालेत असे म्हणतात. इ. स. पू. १७० ते १५९ या २० वर्षाच्या आसपास सुमती भार्गवाने 'मनुस्मृती' लिहील्याचे प्रत्ययास येते. भारतातील आणि भारताबाहेरील समस्त शास्त्र, सूत्र, तत्व, सिध्दांत, मुल्य तपासल्यास ते वैज्ञानीक बुध्दीप्रामाण्यवादी कसोटीपूढे वारंवार ढेपाळतांना दिसतात. निसर्गाच्या पावसात त्यामूळे नूसता विकारांचा चिखल उत्पन्न होतांना दिसतो. भारतीय सनातनाने जन्मानूगत जातीयता बळकट

करण्यासाठी चार वर्ण बनविले. त्यात प्रत्येक उच्च जात तिच्या खालील जातींच्या लोकांना तुच्छ समजते. तथागतांनी भेदभाव–विषमता याला वावच ठेवला नाही. अमेरिका–स्वित्झर्लंडमध्ये अजूनही स्त्रिया राष्ट्रप्रमूख बनू शकल्या नाहीत. स्वित्झर्लंडमध्ये १९७० पर्यंत स्त्रीयांना मतदानाचा अधिकार नव्हता. भगवान बुध्दांनी स्त्री–पुरूष, गरीब–श्रीमंत, उच्च–नीच भेदभाव न करता सर्वांना धम्मात प्रवेश दिला. ''बहुजन हिताय–बहुजन सुखाय'' चा संदेश दिला. कारण येथे सनातनी मुलतत्वांनी ''महाजन हिताय–महाजन सुखाय'' ची चातुर्वर्ण्य व्यवस्था बळकट केली होती. भगवान बुध्दांच्या विचारांचा प्रभाव आशिया खंडाबाहेर दुरपर्यंत गेलेला आहे. जेरेमी बेथंम यांनी 'अधिकतम लोकांचे अधिकतम सुख' हा मांडलेला विचार बुध्द विचारांच्या प्रवाहाचा अस्सल, निर्मल झरा वाटतो. लोकप्रशासनात ल्युथर गुलीक यांनी POSDCORB हा सिध्दांत भगवंतानी प्रतिपादन केलेल्या अष्टांगिक सिध्दांताची व्यावहारीक प्रतिकृती वाटते.

**व्यक्ती, धर्म, समाज – कोण, कोणासाठी?**

प्रत्येकाला माणूसकीची नितांत आवश्यकता असते. त्याशिवाय व्यक्तिमत्त्वाचा विकास शक्य नाही. व्यक्ती धर्म आणि समाजाच्या कचाटयात फसता कामा नये. धर्म आणि समाजामूळे त्याला सुखदायी जीवन जगण्यासाठी बळ मिळावयास पाहीजे. त्यासाठी सहिष्णूता, स्वातंत्र्य आवश्यक असते. स्वातंत्र्य शारीरीक आणि मानसिक अशा दोन्ही प्रकारचे असले पाहीजे. मनुष् हा जन्मत: सामाजिक तद्वतच राजकीय प्राणी आहे, असे ॲरीस्टॉटल म्हणतात. मनुष्याची जडणघडण समाजातच होवू शकते. म्हणून समाजाने सामाजिक स्वातंत्र्याचा सम्यक् दृष्टीकोन बाळगला पाहीजे. एका समूहाला पायदळी तुडवायचे आणि एका समूहाला डोक्यावर नाचवायचे हे योग्य नव्हे. सनातनी सिध्दांताद्वारे भारतात तीच स्थिती भक्कम केली.

श्शुद्रं तु कायरेडास्यं क्रितमक्रीतमेव वा,<br>
दास्यायैव हि सृष्टोस्या ब्राम्हणस्य स्वयंभूवा।

यामुळे शतकानूशतके शुद्रातिशुद्रांची अवहेलना, प्रताडना, कुचंबना झाली. त्याला धर्मश्रध्दांचा भावनिक आधार दिल्याने दुष्ट आणि मुर्ख लोकांनी अन्यायाची परिसीमा गाळली. अत्यंत उच्चशिक्षित माणसे उच्चतम पदावर आसीन झाल्यावर देखील जातीयता पाळतात. २०१७ मध्ये हा उच्चनीचतेचा घाणेरडा विचार मनात घर करून आहे. ही शरमेची बाब आहे. डॉ. मेघा खोले यांच्या घरी निर्मला यादव स्वयंपाकी म्हणून काम करतांना ती शुद्र (मराठा) जाती गटाची आहे हे लक्षात आल्यावर खोले भगिनी सोवळे बाटवल्याचा उद्विग्न मन:स्ताप अभिव्यक्त करतात. याला काय म्हणावे? हेतू कितीही उदात्त असला तरीही नूसते Vision, Mission, Passion असून चालत नाही. त्यासाठी Compassion अतिशय आवश्यक आहे.

1. खैरमोडे, चा , भ, – डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीची पार्श्वभूमी श्री, विद्या प्रकाशन पुणे, – १९७८
2. खरात , शंकरराव – डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा इमामदार बंधू प्रकाशन, पुणे, १९८७
3. जोशी, डॉ. बी. आर. – समाजवादी डॉ. आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे – १९९५
4. फडके, य. दी. –आंबेडकर चळवळ, श्री. विद्या प्रकाशन, पुणे – १९९८
5. चिटणीस, प्रा. म. भि. – सामाजिक लोकशाहीचे प्रणेते डॉ. बाबायाहेब आंबेडकर, प्रबोधन प्रकाशन, पुणे.
6. Barianttry, D. k. - Dr. Ambedkar : A pioneer of Labour Welfare, Budhist Publication House Private Ltd. Jalandhar.

7. Grover, Virender - Bhimrao Ramji Ambedkar A Biography of his Vison and Ideas Deep and Deep Publication, New Delhi,-110027
8. Jatava, Dr. D. R. - The political Philosophy of Dr, Ambedkar Phoenix Publishing House, Agra-1965